**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०१३७८१
E-mail ID:- sangeeta.kholgadge@nic.in

क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२८/आस्था-८
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
दिनांक :- १८ फेब्रुवारी,२०२१

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी ,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

**विषय :- ग्रामपंचायम कर्मचा-यांना जिल्हा परिषद सेवेतील वर्ग-३ च्या पदावर १०% आरक्षणामधून नियुक्त्याबाबत.**

**संदर्भ :-** १) ग्रामविकास विभाग, अधिसूचना क्र. व्हीपीएम-२००४/प्र.क्र.२६१/पंरा-५, दिनांक १९/०८/२००५
२) शासनपत्र क्र.एपिटी-२००८/प्र.क्र.३८/आस्था-८, दि. १३ मार्च,२००८
३) शासनपत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१७३/आस्था-८, दि.०३ सप्टेंबर,२०१९
४) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दिनांक ०४ मे,२०२०
५) शासनपत्र समक्रमांक दिनांक १४/१२/२०२०

महोदय,

विषयांकीत प्रकरणी शासनाच्या संदर्भाधीन क्र. १ ते ५ चे अवलोकन व्हावे.

२. शासनाच्या मेगा भरती -२०१९ अंतर्गत जिल्हा परिषदेकडील वर्ग-३ च्या संवर्गातील सरळसेवा पदभरतीची कार्यवाही सुरु असल्याने सन २०१९ मधील मेगा भरती करिता दिलेल्या जाहीरातीमधील नमूद संवर्गातील एकूण रिक्त पदांच्या अधिन राहून १० % ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचा-यांच्या नियुक्तीची कार्यवाही करण्याबाबत संदर्भाधीन दिनांक ०३ सप्टेंबर,२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दिनांक ०४ मे,२०२० च्या शासन निर्णयाने पदभरतीवर निर्बंध असल्याने त्या अनुषंगाने १० % ग्रामपंचायत कर्मचा-यांना जिल्हा परिषदेच्या सेवेमध्ये नियुक्ती देता येणार नाही असे संदर्भाधीन दिनांक १४/१२/२०२० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

३. आता वित्त विभागाने त्यांच्या दिनांक ०४ मे,२०२० च्या शासन निर्णयातील निर्बध शिथील करुन १० % ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या जिल्हा परिषदेतील नियुक्त्यांबाबत मान्यता दिलेली आहे . त्यामुळे **ज्या जिल्हा परिषदांनी अद्याप पर्यंत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-२०१९ च्या रिक्त पदांच्या अधिन राहून १० % ग्रामपंचायत कर्मचा-यांना नियुक्त्या दिलेल्या नाहीत त्यांना "नियुक्त्या" देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत**

**आहे.** या संदर्भात शासन अधिसूचना दिनांक १९/०८/२००५ तसेच संदर्भाधीन दिनांक ०३ सप्टेंबर,२०१९ च्या पत्रातील सुचनांचे कोटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी.

४. तसेच संदर्भाधीन शासन पत्र दिनांक १३ मार्च,२००८ नुसार "ज्या ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वय दिनांक १ जानेवारी,२०१९ रोजी ४५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी आहे असे ग्रामपंचायत कर्मचारी नियुक्तीसाठी पात्र राहतील."

आपली

18.02.2021

(सं.म.खोलगाडगे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद (सर्व)

२) उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

३) निवडनस्ती-आस्था-८